प्रेस नोट दिनांक १५/०९/२०१८

## मोका मधील पाहिजे असणाऱ्या देश पातळीवर कार्यरत कुप्रसिध्द वेश्या दलाल "टोनी" यास अटक केलेबाबत

गेले २० वर्षापासून मुंबईमधून देश पातळीवर तसेच उजबेकीस्तान, रशिया येथील मुलींमार्फत वेश्या व्यवसायासाठी मुली पुरविणारा कुप्रसिध्द दलाल तसेच **मोका अंतर्गत येरवडा पोलीस स्टेशन, गु.र.नं. ७५७/२०१७** भा.द.वि. कलम ३७०, ३७०(अ) सह इटपा कायदा कलम ३,४,५ या गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२), (३)(४) मध्ये पाहिजे असणारा खालील नमूद आरोपी यास दिनांक **१४/०९/२०१८ रोजी मिरारोड, ठाणे येथे** ताब्यात घेऊन आज दिनांक १५/०९/२०१८ रोजी नमूद गुन्हयात अटक करुन मोका कोर्टामध्ये हजर करण्यात येत आहे.

**१) इकबाल सिंग महिंद्र पाल ऊर्फ टोनी वय ४२ रा.भैरव रेसिडन्सी, एफ विंग, कनकिया, मिरारोड ठाणे**

सदर टोनी हा मुळचा पंजाब येथील असून गेले **२० वर्षापासून मुंबईमधून वेश्या व्यवसायासाठी देश व परदेशातील मुली, महिला देशातील वेगवेगळया भागांमध्ये वेश्या व्यवसायामध्ये** कार्यरत असणाऱ्या दलालांना पुरविण्याचे काम करीत होता. वर नमुद गुन्हयामध्ये त्याचे फक्त **"टोनी"** हे नाव निष्पन्न झालेले होते. तपास अधिकारी यांनी सामाजिक सुरक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत त्याचा संपूर्ण नाव व पत्ता प्राप्त करुन गेले २० दिवसांपासून त्याला शोधण्यासाठी १ पथक ठेवण्यात आलेल्या पथकाद्वारे त्याला अटक करण्यात आलेली असून त्याच्याकडे पुणे शहरामध्ये नमूद गुन्हयामध्ये अधिक तपास करीत आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, पोउनि आनंत व्यवहारे, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, राजाराम घोगरे, किरण अब्दागिरे, निलेश पालवे यांनी कारवाई केली आहे.